मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सुरक्षित मातृत्व आश्वासन अंतर्गत महापालिकेची आठ रुग्णालये!

## प्रसूतीसाठी दाखल झालेल्या महिलांना मोफत मिळणार 'या' सुविधा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

सुरक्षित मातृत्व आश्वासन कार्यक्रमात पिंपरी-चिंचवड महापालिकेची आठही रुग्णालये समाविष्ट करण्यात आली आहेत. तीन वेगवेगळ्या गटांमध्ये या रुग्णालयांचा समावेश केला आहे. त्यानुसार, संबंधित रुग्णालयांमध्ये प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात झाली आहे. केंद्र शासनाच्या सुरक्षित मातृत्व आश्वासन कार्यक्रमात प्रसूतीविषयक मूलभूत काळजी (सुमन बेसिक) या गटामध्ये पिंपरीतील जिजामाता रुग्णालय, आकुर्डी रुग्णालय, यमुनानगर रुग्णालय, सांगवी रुग्णालय आणि



नवीन थेरगाव रुग्णालय यांचा समावेश केला आहे, तर मूलभूत तातडीची प्रसूतीविषयक काळजी (बी मॉक) या प्रकारात नवीन भोसरी रुग्णालय आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय (तालेरा रुग्णालय) यांचा समावेश करण्यात आला आहे. तर, व्यापक तातडीची प्रसूतीविषयक काळजी (सी मॉक) या प्रकारात महापालिकेच्या पिंपरी- संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचा समावेश करण्यात आला आहे. बाळ जन्मल्यापासून पुढील महिनाभराच्या कालावधीसाठी लागणारी वैद्यकीय सेवा मोफत दिली जाते. बाळाचे सर्व लसीकरण मोफत केले जाते. महिलेला प्रसूतीसाठी रुग्णालयात आणताना आणि घरी सोडताना मोफत रुग्णवाहिका सेवा, रुग्णालयामध्ये सर्वसाधारण प्रसूतीसाठी तीन दिवस,

> महापालिकेच्या आठही रुग्णालयांमध्ये सुरक्षित मातृत्व आश्वासन कार्यक्रम राबविला जात आहे. विविध विभागांमध्ये ही रुग्णालये समाविष्ट केली आहे. या कार्यक्रमांतर्गत रुग्णालयांमध्ये प्रसूतीसाठी दाखल माता आणि जन्मलेल्या बाळाची काळजी घेतली जात आहे.
>
> -डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका

तर शस्त्रक्रियेद्वारे झालेल्या प्रसूतीसाठी (सिझेरियन डिलिव्हरी) सात दिवसापर्यंत महिलांना अन्न मोफत दिले जाते. महिलांच्या प्रसूतीनंतर पुढील ४२ दिवसांपर्यंत आशा वर्कर माहिती घेत राहतात. महिलांना जननी शिशु सुरक्षा योजनेचे देखील फायदे मिळतात. सुरक्षित मातृत्व आश्वासन कार्यक्रमात सर्व गरोदर माता, सहा महिन्यांपर्यंतच्या स्तनदा माता, तसेच सर्व आजारी बालके यांचा समावेश केला आहे. माता व बालकांना नऊ गुणात्मक सेवा उपलब्ध करून देण्याची हमी या कार्यक्रमात देण्यात आली आहे. तसेच, या कार्यक्रमांतर्गत सर्व सेवा बंधनकारक आणि मोफत देण्यात येणार आहेत.

# भारतातील सर्वात मोठे कृषि प्रदर्शन!

## किसान १३ ते १७ डिसेंबर मोशीमध्ये..!

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

भारतातील सर्वात मोठे कृषि प्रदर्शन किसान १३ ते १७ डिसेंबर २०२३ दरम्यान पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व संमेलन केंद्र, मोशी, भोसरीजवळ, पुणे येथे आयोजित होत आहे. १५ एकर प्रदर्शन क्षेत्रावर ४५० हून अधिक कंपन्या, संशोधन संस्था, नव उद्योजक शेतीतील नवीन तंत्रज्ञान व उत्पादने सादर करतील. प्रदर्शनात, ५ दिवसांमध्ये देशभरातून एक लाखाहून अधिक शेतकरी भेट देतील असा अंदाज आहे. आधुनिक तंत्रज्ञान व नवे विचार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हे किसान प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. किसान प्रदर्शनाला शेती क्षेत्रातील मान्यवर संस्थांचा सहभाग व सहकार्य लाभले आहे. यंदा किसान प्रदर्शनात संरक्षित शेती, पाणी नियोजन, कृषी निविष्ठा, यंत्रसामुग्री, पशुधन, जैव, ऊर्जा, वाटिका व शेती लघु उद्योग अशी विभागवार दालने उभी करण्यात आलेली आहेत. प्रत्येक दालनात त्या विशिष्ठ विभागातील स्टॉल शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. शेतीसाठी लागणारी यंत्रे व उपकरणांचे प्रदर्शन खुल्या जागेत केले आहे. मोबाईलचा वाढता वापर आणि डिजीटल इंडिया उपक्रमांमुळे शेतकऱ्यांशी संवाद साधणे सहज शक्य झाले आहे. यामुळेच उद्योजक नवनवीन सेवा व उत्पादने शेतकऱ्यांसमोर मांडण्यास उत्सुक आहेत. हे उद्योजक प्रामुख्याने बाजारभाव, जल व्यवस्थापन, शेतमालाचे मूल्यवर्धन, जैवतंत्र या क्षेत्रात नवीन संकल्पना घेऊन येत आहेत. या प्रदर्शनात शेतकरी कृषी क्षेत्रात येऊ घातलेले नवीन तंत्रज्ञान व त्यामुळे निर्माण होणाऱ्या संधींची माहिती घेऊ शकतील. प्रदर्शनामध्ये कृषी क्षेत्रातील नवउद्योजकांसाठी स्पार्क या दालनाचा समावेश असणार आहे. ज्यामध्ये नवीन तंत्रज्ञान व नाव कल्पनांना चालना देण्यात येईल.

# महापालिकेकडून करबुडव्यांचा शोध सुरू

## मालमत्तांचे सर्वेक्षण आणि नवीन मालमत्ता कर नोंदणी अभियान सुरू

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाच्या वतीने मालमत्तांचे सर्वेक्षण आणि नवीन मालमत्ता कर नोंदणी अभियान सुरू असून आतापर्यंत एक लाख १७ हजार विनानोंदी मालमत्ता आढळल्या आहेत. सर्वेक्षणात ३५ टक्के नव्या मालमत्ता कर कक्षेत येण्याचा विभागाचा अंदाज आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने २०२३-२४ या आर्थिक वर्षात आजअखेर ६४० कोटींचा कर वसूल केला आहे.




यंदा एक हजार कोटी रुपये उत्पन्न मिळवण्याचे उद्दिष्ट आहे. मालमत्ता सर्वेक्षण आणि मालमत्ता कर नोंदणी अभियानामुळे आगामी आर्थिक वर्षात मागील करांची थकबाकी आणि चालू मागणी असे १५०० कोटी रुपये महापालिका तिजोरीत जमा होण्याची शक्यता आहे. बांधकाम परवानगीतून मिळणाऱ्या उत्पन्नात घट होत आहे. त्यामुळे मालमत्ता कर उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन मालमत्ता कर प्रणालीचा अभ्यास करून आयुक्त शेखर सिंह यांनी सर्वंकष मालमत्ता आकारणीची योजना आखली. कर कक्षेत नसलेल्या मालमत्ता शोधण्यासाठी सर्वेक्षण हाती घेतले. आतापर्यंत एक लाख १७ हजार विनानोंदी मालमत्ता आढळल्या आहेत.

नोंदणी नसलेल्या या मालमत्ता नव्याने विकसित झालेल्या वाकड, थेरगाव, किवळे, चिखली, मोशी, दिघी या भागातील आहेत. या भागात ३६ टक्के मालमत्ता सापडल्या आहेत. त्यामुळे उर्वरित नऊ झोनमध्ये सर्वेक्षण केल्यानंतर ८५ हजार अशा दोन लाख नोंदणी नसलेल्या मालमत्ता आढळून येतील, असा अंदाज आहे. ज्या मालमत्तांची अंतर्गत मोजणी झाली आहे, त्यामध्ये नोंदणी असलेल्या आणि नोंदणी नसलेल्या मालमत्तांचा समावेश आहे. मात्र, नोंदणी नसलेल्या मालमत्तांची कर आकारणी पहिल्या टप्प्यात होणार आहे. मालमत्तांची करवाढ होणार नसून फक्त मालमत्तांचे सर्वेक्षण, अंतर्गत मोजणी केली जात आहे.

> “ महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वेक्षण महत्त्वाचे आहे. पूर्ण सर्वेक्षण झाल्यानंतर दोन लाख मालमत्ता कर कक्षेत येतील, असा अंदाज आहे. त्यामुळे मालमत्ता करातून मिळणारे उत्पन्न दुप्पट होण्याची शक्यता आहे. मालमत्तांना ‘डिजिटल लॉकर’ ही सुविधा देण्यात येणार आहे.
>
> -नीलेश देशमुख, सहायक आयुक्त, कर आकारणी विभाग, महापालिका

# जेएनपीटी बंदरामुळे बाधित झालेल्या हनुमान कोळीवाडा, ग्रामस्थांचे पुनर्वसन करा..!

## जेएनपीटीचा प्रस्तावाला मान्यता द्या : खा.श्रीरंग बारणे यांची मागणी

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** जेएनपीटी बंदरामुळे बाधित झालेल्या हनुमान कोळीवाडा, नवीन शेवामधील ग्रामस्थांचे शासनाने तयार केलेल्या करारानुसार पुनर्वसन करावे. ग्रामस्थांनी जेएनपीटी टाऊनशिप आणि नजीकच्या कस्टम इमारतीला लागून असलेल्या १७.२८ हेक्टर जमिनीला तर नवीन शेवाच्या ग्रामस्थांनी बोकडविराला लागून असलेल्या अतिरिक्त २३ हेक्टर जमिनीला प्राधान्य दिले आहे. त्यांना ही जागा देण्याबाबतचा प्रस्ताव जेएनपीटीने पाठविला आहे. त्याला तत्काळ मान्यता देण्याची मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली. याबाबत खासदार बारणे यांनी केंद्रीय जहाज व जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांची भेट घेतली. त्यांना ग्रामस्थांची मागणी आणि जेएनपीटीने पाठविलेल्या प्रस्तावाची माहिती देत मंजुरी देण्याची विनंती केली. त्याबाबत सविस्तर निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की, मावळ मतदारसंघातील हनुमान कोळीवाडा आणि नवीन शेवा गावाच्या पुनर्वसनाच्या अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. जेएनपीटी बंदर आणि लगतच्या बांधकामासाठी संपादित केलेल्या जमिनीवर हे गाव वसलेले होते. बंदरे, जेएनपीटी बंदरांच्या स्थापनेपूर्वी हनुमान कोळीवाडा आणि नवीन शेवा गावातील रहिवासी शेती, मासेमारी, दुग्धव्यवसाय आणि फळशेती यातून आपली उपजीविका करत होते. हा परिसर आंबा आणि काजूच्या झाडांनी समृद्ध आहे. जे उत्पन्नाचे प्राथमिक स्रोत होते.

भूसंपादनानंतर शेवा गावाचे नवीन शेवा आणि हनुमान कोळीवाडा असे दोन भाग झाले. १९७६ च्या एमआरपीडीपी कायद्यानुसार ६१७ कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले. २३ मे १९८५ रोजी एनएसपीटी बंदर व्यवस्थापन, सरकारी अधिकारी प्रतिनिधी आणि शेवा गावातील रहिवाशांनी बोकडवीरा उरणजवळील शेवा गावात ३३.६४ हेक्टर (८२.७० एकर) आणि बोरी पखाडीत शेवा कोळीवाडगावासाठी (आता हनुमान कोळीवाडा) अतिरिक्त १७.२८ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याचे मान्य केले होते.

गेली ३७ वर्षे हनुमान कोळीवाड्यातील ग्रामस्थ केवळ १.७५ हेक्टर जमिनीवर राहत आहेत आणि नवीन शेवाचे ग्रामस्थ १० हेक्टर जमिनीवर राहत आहेत. ज्याला ट्रान्झिट कॅम्प हनुमान कोळीवाडा आणि नवीन शेवा येथील रहिवासी असे नाव देण्यात आले आहे. रहिवाशी चार दशकांपासून पुनर्वसनाची वाट पाहत आहेत. त्यांच्या मागण्या माफक आणि जेएनपीटी आणि सरकारच्या आवाक्यातल्या आहेत. हनुमान कोळीवाड्यातील ग्रामस्थ ज्या १.७५ हेक्टर जमिनीवर राहतात. त्यामध्ये वाळवी आल्याने ग्रामस्थांची घरे, कपडे व इतर मौल्यवान वस्तू दिवसेंदिवस खराब होत आहेत.

हनुमान कोळीवाड्यातील ग्रामस्थांनी जेएनपीटी टाऊनशिप आणि नजीकच्या कस्टम इमारतीला लागून असलेल्या १७.२८ हेक्टर जमिनीला पसंती दिली आहे आणि नवीन शेवाच्या ग्रामस्थांनी बोकडविराला लागून असलेल्या अतिरिक्त २३ हेक्टर जमिनीला प्राधान्य दिले आहे. जे त्यांच्या पुनर्वसनासाठी एक आदर्श जागा असेल असे त्यांना वाटते. ही जमीन त्यांना लवकरात लवकर पुनर्वसनासाठी उपलब्ध करून द्यावी. पुनर्वसनासाठी पात्र असलेल्या सर्व ६१७ कुटुंबांना आधी मान्य २५६ भूखंड हनुमान कोळीवाडा आणि ३६१ भूखंड नवीन शेवा देण्यात यावे. त्याबाबतच्या जीएनटीपीच्या प्रस्तावाला मान्यता देण्याची आग्रही मागणी खासदार बारणे यांनी केली.

# वाड्यांना ‘एसआरए’ भासवून केली जाणारी बांधकामे थांबवा

## एसआरए पुनर्विकास करण्याचा प्रकार आला समोर

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पेठांमध्ये जुन्या वाड्यांना झोपडपट्टी असल्याने दाखवून त्यांचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत (एसआरए) पुनर्विकास करण्याचा प्रकार समोर आल्यानंतर महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी अशा प्रकारे परवानगी घेतलेल्या सर्व बांधकामांना स्थगिती द्यावी असे पत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्याधिकाऱ्यांनी लिहिले आहे. तसेच महापालिका स्तरावर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तीन अधिकाऱ्यांची समिती गठित केली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणात जुने वाडे, जुन्या इमारती आहेत. त्यांच्या पुनर्विकासासाठी शासनाकडून राज्याच्या एकात्मिक बांधकाम विकास नियमावलीत तयार करण्यात आली आहे. नियमांची पूर्तता करणे शक्य नसल्याने




अनेक वाड्यांचा पुनर्विकास रखडलेला आहे. दरम्यान, ‘एसआरए’ने शासनाला पत्र लिहून शहरातील एखाद्या भागात झोपडपट्टीसदृश भाग असल्यास आणि महापालिकेच्या संबंधित विभागाने त्याबाबत अभिप्राय दिल्यास अशा ठिकाणी ‘एसआरए’ राबविता येईल. त्यास मान्यता द्यावी अशी मागणी केली होती. त्यानुसार शहराच्या मध्यवर्ती भागातील जुने वाडे झोपडपट्टी भासवून तेथे एसआरए योजना राबविण्याचा उद्योग काही बांधकाम व्यावसायिक, राजकीय एजंट आणि क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी, उपअभियंत्यांनी सुरु केला. या वाड्याला एसआरएचा दर्जा मिळाल्याने महापालिकेचे बांधकाम विकसन शुल्कही बुडाला आहे. शिवाय बिल्डरांनी तेथे टीडीआर खर्ची पाडून स्वत:चा फायदा करून घेतला आहे. यामध्ये एका प्रकरणामागे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना ३० रुपये मिळाले असून, सुमारे ७० परवानग्या अशा प्रकारे दिल्या असल्याचा आरोप माजी नगरसेवक उज्वल केसकर यांनी केला होता. तशी तक्रार आयुक्तांकडेही केली होती. त्यानुसार आयुक्तांनी एसआरएच्या मुख्याधिकाऱ्यांना पत्र लिहिले असून, त्यामध्ये जुन्या वाड्यांना एसआरए अंतर्गत देण्यात आलेल्या परवानग्या स्थगित करून तेथील बांधकाम बंद करावे. तसेच त्याचा अहवाल महापालिकेला सादर करावा, असे त्यात नमूद केले आहे.

### बाणेर प्रकरणाचा अहवाल प्रलंबित

**» पेठांमध्ये जुन्या वाड्यांना झोपडपट्टी असल्याने दाखवून त्यांचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत (एसआरए) पुनर्विकास करण्याचा प्रकार समोर आल्यानंतर महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी अशा प्रकारे परवानगी घेतलेल्या सर्व बांधकामांना स्थगिती द्यावी असे पत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्याधिकाऱ्यांनी लिहिले आहे. बाणेर येथे बांधकाम सुरु असताना पादचारी मार्गावरून आईसोबत चालत जाणाऱ्या नऊ वर्षाच्या मुलाच्या डोक्यात लोखंडी गट्टू पडून त्याचा मृत्यू झाला. या बांधकामाबाबत अनेक तक्रारी आल्याने आयुक्तांनी अधिक्षक अभियंता युवराज देशमुख यांना तीन दिवसात यासंदर्भात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते.**

या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता युवराज देशमुख, मालमत्ता व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त महेश पाटील आणि दक्षता विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गिरोला यांची समिती गठित केली आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर संबंधित अधिकारी, उपअभियंत्यांवर कारवाई केली जाणार आहे.

# आयबीपीएससाठी बार्टीने किती कोटी खर्च केले?

## माहिती अधिकार अर्जातून उघड झाली आकडेवारी

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेतर्फे (बार्टी) आयबीपीएस परीक्षांसाठी मार्गदर्शन उपक्रमावर गेल्या आठ वर्षांत जवळपास १४० कोटी रुपयांवर अधिक खर्च करण्यात आला आहेत. त्यात २८ हजार ३५० उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले असून, २०१८-१९पर्यंत २ हजार ७५० उमेदवारांची शासकीय-निमशासकीय सेवेत निवड झाली आहे. गेल्या आठ वर्षांतील सर्वाधिक ९० कोटी रुपये गेल्या दोन वर्षांत खर्च करण्यात आल्याचे समोर आले आहे.

कुलदीप आंबेकर यांनी माहिती अधिकाराअंतर्गत बार्टीकडे आयबीपीएस परीक्षांसाठी मार्गदर्शन उपक्रमाची माहिती मागितली होती. त्याला बार्टीकडून दिलेल्या उत्तरातून ही स्थिती समोर आली आहे. राज्यातील ३७ प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून आयबीपीएस परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्यात आले. त्यात २०१५-१६मध्ये १ हजार १५० उमेदवारांसाठी ३ कोटी ३३ लाख ५० हजार रुपये, २०१६-१७मध्ये २ हजार ७०० उमेदवारांसाठी ६ कोटी ६७६ लाख रुपये, २०१७-१८मध्ये १ हजार ८०० उमेदवारांसाठी ३ कोटी ३३ लाख ५० हजार रुपये, २०१८-१९मध्ये ९ हजार १०० उमेदवारांसाठी २७ कोटी ३० लाख रुपये, २०१९-२०मध्ये ४ हजार ६०० उमेदवारांसाठी १३ कोटी ८० लाख रुपये खर्च करण्यात आले. २०२०-२१मध्ये करोना प्रादुर्भावामुळे प्रशिक्षण कार्यक्रम स्थगित करण्यात आला होता. २०२१-२२ ४ हजार ५०० उमेदवारांसाठी ४५ कोटी रुपये, तर २०२२-२३मध्ये ४ हजार ५०० उमेदवारांसाठी ४५ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या प्रशिक्षण कार्यक्रमातून २०१८-१९पर्यंत २० टक्के उमेदवारांची, म्हणजेच २ हजार ७५९ उमेदवारांची निवड झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. गेल्या आठ वर्षांत करण्यात आलेल्या खर्चातील सर्वाधिक ९० कोटी रुपये खर्च गेल्या दोन वर्षांत करण्यात आला. त्याच वेळी गेल्या दोन वर्षांतील उमेदवारांच्या संख्येपेक्षा २०१८-१९मध्ये विद्यार्थी संख्या जास्त असूनही त्या वर्षीचा खर्च गेल्या दोन वर्षांपेक्षा कमी असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते बार्टीतर्फे आयबीपीएस परीक्षा प्रशिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आल्याचे समोर आले आहे. मात्र त्या तुलनेत यशस्वी विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. मार्गदर्शक संस्थाही वर्षानुवर्षे त्याच आहेत.

### उपक्रमाची मागितली होती माहिती

**» डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेतर्फे (बार्टी) आयबीपीएस परीक्षांसाठी मार्गदर्शन उपक्रमावर गेल्या आठ वर्षांत जवळपास १४० कोटी रुपयांवर अधिक खर्च करण्यात आला आहेत. त्यात २८ हजार ३५० उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले असून, २०१८-१९पर्यंत २ हजार ७५० उमेदवारांची शासकीय-निमशासकीय सेवेत निवड झाली आहे. गेल्या आठ वर्षांतील सर्वाधिक ९० कोटी रुपये गेल्या दोन वर्षांत खर्च करण्यात आल्याचे समोर आले आहे. कुलदीप आंबेकर यांनी माहिती अधिकाराअंतर्गत बार्टीकडे आयबीपीएस परीक्षांसाठी मार्गदर्शन उपक्रमाची माहिती मागितली होती.**

# अभिव्यक्ती स्वातंत्र हे बेताल वक्तव्य करण्यासाठी दिलेलं नाही!

## अश्यांना वेळीच आवरायला हवं : हायकोर्ट

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुण्यातील एका आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स कंपनीनं केलेलं कर्मचा-याचं निलंबन हायकोर्टाकडून कायम ठेवण्यात आले आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे बेताल वक्तव्य करून नियमांचं उल्लंघन करण्यासाठी दिलेलं नाही. अशा प्रवृत्तीला वेळीच आळा घातला नाही तर समाजात चुकीचा संदेश जाईल, असं स्पष्ट मत मुंबई उच्च न्यायालयानं एका निकालात नोंदवलं आहे. तलवारीनं कापून काढण्याची भाषा करत सोशल मीडियावर एखाद्यानं पोस्ट लिहिली असेल तर त्याच्याकडून ही कृती होण्याची वाट बघणं चुकीचं ठरेल. अशा गोष्टींना वेळीच प्रतिबंधित करायला हवा, अन्यथा ते समाजासाठी घातक ठरु शकते, असं निरीक्षण न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांनी आपल्या निकालात नोंदवत खासगी कंपनीतील एका कर्मचाऱ्याचं निलंबन योग्य ठरवलं आहे. निरजकुमार कडू हे पुण्यातील 'हिताची' कंपनीत साल २००८ पासून कार्यरत होते.




कंपनी व कामगार युनियनमध्ये ब-याच काळापासून वेतनावरुन वाद सुरू होता. त्यादरम्यान कडू यांनी एक फेसबुक पोस्ट लिहिली होती. 'मॅनेजमेंटच्या लोकांना तलवारीनं कापा', असं कडू यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिलं होतं. त्याची गंभीर दखल घेत कंपनीनं शिस्तभंगाची कारवाई करत कडू यांना निलंबित केलं. त्याविरोधात कडू यांनी कामगार न्यायालयात धाव घेतली. कामगार न्यायालयानं कडू यांचं निलंबन रद्द केलं. त्याविरोधात मग कंपनीनं मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करत कामगार न्यायालयाचे आदेश रद्द करण्याची मागणी केली होती. शिस्तभंगाची कारवाई नियमानुसार केलेली आहे. कडू यांना बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. तरीही कामगार न्यायालयानं कडू यांचे निलंबन रद्द केलं.

कामगार न्यायालयाने कंपनीचे मुद्दे ग्राह्यच धरले नाहीत, असा दावा कंपनीनं हायकोर्टात केला. तर आपण केवळ फेसबुक पोस्ट लिहिली होती, तशी कोणतीही कृती केलेली नाही. तसेच फेसबुक पोस्ट ही कंपनीच्या आवारात लिहिलेली नाही. त्यामुळे शिस्तभंगाची कारवाई होऊ शकत नाही, असा युक्तिवाद कडू यांनी आपल्या बचावात केला होता. आस्थापनेत अथवा आस्थापनेच्या बाहेर कर्मचाऱ्याचं वर्तन हे सभ्यच असायला हवं. कडू यांनी फेसबुक पोस्ट लिहिली तेव्हा कंपनीत तणावाचं वातावरण होतं. त्यांच्या या पोस्टवर अन्य कर्मचाऱ्यांनीही कमेंट होत्या. मॅनेजमेंटच्या लोकांना तलवारीनं कापण्याची भाषा कर्मचारी करत असेल तर त्याला वेळीच अटकाव करायला हवा, असं निरीक्षण हायकोर्टानं आपल्या निकालात नोंदवलं आहे. पुण्यातील एका आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स कंपनीनं केलेलं कर्मचा-याचं निलंबन हायकोर्टाकडून कायम ठेवण्यात आले आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे बेताल वक्तव्य करून नियमांचं उल्लंघन करण्यासाठी दिलेलं नाही. अशा प्रवृत्तीला वेळीच आळा घातला नाही तर समाजात चुकीचा संदेश जाईल, असं स्पष्ट मत मुंबई उच्च न्यायालयानं एका निकालात नोंदवलं आहे.

# राज्य मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा

## राज्य सरकारने आनंद निरगुडे यांचा राजीनामा स्विकारला

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्य मागासवर्ग आयोगात राजीनाम्यांचं सत्र सुरुच आहे. राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती आनंद निरगुडे यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिलाय आणि मुख्यमंत्र्यांनी त्यांचा राजीनामा स्विकारला आहे. एबीपी माझानं सगळ्यात पहिल्यांदा ही बातमी दिली होती. आजच होणार मराठा आरक्षणासंदर्भात विधानसभेत चर्चा होणार आहे. यामुळे मराठा आरक्षणाला (चरऑरीहर ठशीशऑरींळेप) सहाय्यभूत ठरेल अशी माहिती राज्य मागासवर्ग आयोगाकडून मिळवण्याच्या राज्य सरकारच्या प्रयत्नांना धक्का बसला आहे. मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या क्युरीटीव्ह पिटीशनवर सुनावणी प्रलंबित असतानाच राज्य मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. क्युरीटीव्ह पिटीशनला सहाय्यभूत ठरेल असा डेटा राज्य सरकारला या मागासवर्ग आयोगाकडून अपेक्षित होता. मात्र राज्य सरकारमधील दोन मंत्र्यांचा मागासवर्ग आयोगाच्या कामकाजात हस्तक्षेप होत असल्यचा आणि राज्य



सरकारला हवा तसाच डेटा आयोगाने तयार करुन द्यावा असा दबाव आयोगावर टाकला जात असल्याचा आरोप होत आहे. राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती आनंद निरगुडे पदाचा राजीनामा हे कामकाजात सरकारमधील मंत्र्यांच्या लुडबुडमुळे दिला आहे. ते दोन मंत्री कोण आहेत? यासंदर्भात अद्याप कोणती माहिती सममहिनाभरात आयोगातील पाच सदस्यांनी राजीनामा झाला आहे. आयोगाच्या बालाजी सागर किल्लारीकर आणि लक्ष्मण हाके या दोन सदस्यांनी याआधीच राजीनामा दिलाय. आयोगाचे अध्यक्ष आनंद निरगुडे यांनीही दबावामुळे

### मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला

» राज्य मागासवर्ग आयोग हा मागासवर्गातील जातीची माहिती गोळा करण्यासाठी आहे. राज्य मागासवर्ग आयोग हा स्वायत्त आहे. आयोग हा स्वायत्त आहे पण माहिती देण्यासाठी आयोगावर सरकारकडून दबाव टाकण्यात आल्याचे सदस्यांचे म्हणणे आहे. सर्वेक्षणातून आलेली माहिती आम्ही तुम्हाला देऊ शकतो, परंतु सरकारला अपेक्षीत माहिती देणे आम्हाला शक्य नाही. जी माहिती आमच्याकडे आहे तीच माहिती पुरवू शकतो, असे आयोगाच्या सदस्यांचे म्हणणे होते. मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला असून, हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरकारकडून जोरदार प्रयत्न सुरु आहे. दरम्यान, अशात राज्य सरकारकडून आता मागासवर्ग आयोगाला देखील मराठा समाजाचे सर्वेक्षण करण्यास सांगण्यात आले आहे.

राजिनामा दिल्याची चर्चा आहे. मात्र यामुळे मराठा आरक्षणासाठी हवी ती माहिती मिळवण्याचे आणि आयोगाची पुर्नरचना करण्याचे आव्हान राज्य सरकारसमोर असणार आहे. ेर आलेली नाही.